# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 17/04/2020 (शुक्रवार)
(सायंकाळ)

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारुची
## वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

पो.स्टे. उमरेड :– दिनांक 17/04/2020 रोजी स्थानिक गुन्हे शाखा, नागपूर ग्रामीणचे पथक पो. स्टे. उमरेड परिसरात पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त माहिती मिळाली की, मौजा उमरेड ते बुटीबोरी मार्गे एमएच–31/सीएम– 5177 क्रमांकाच्या एका पांढऱ्या रंगाच्या मारोती ओमनीने अवैधरीत्या हातभट्टी मोहाफुल दारूची वाहतुक होणार आहे. अशा माहिती वरून स्थानिक गुन्हे शाखाच्या पथकाने मौजा दहेगाव फाटा येथे जावुन मौजा उमरेड ते बुट्टीबोरी रोडवर नाकाबंदी केली. दरम्यान उमरेड रोड कडून एक पांढऱ्या रंगाची मारोती ओमनी एमएच–31/सीएम– 5177 येतांना दिसली. सदर वाहनाला थांबवुन तपासले असता वाहनात आरोपी नामे क्र. 1) सारंग शामराव मेश्राम(चालक), वय 27 वर्ष, रा. चिचभवन, नागपूर, 2) सागर गजानन शेंडे, वय 27 वर्ष, रा. मनिष नगर नागपूर, 3) जितु सुधीर श्रीवास्तव, वय 34 वर्ष, रा. सोमलवाडा, नागपूर व 4) सुधाकर प्रभाकर कावणे, वय 36 वर्ष, रा. वर्धा रोड चिचभवन, नागपूर यांच्या ताब्यातुन ओमनी गाडीच्या सिट मध्ये जवळ चार भरलेल्या प्लास्टीक कॅन मिळून आले. सदर कॅन मध्ये हातभट्टी मोहाफुल दारू 60 लिटर कि. 18,000 /–रू., वाहन 50,000/–रू. असा एकुण किंमती 68,000/–रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. पो. स्टे उमरेड येथे गुन्हा दाखल आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस हवालदार संतोष पंढरे, स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम 65 (अ), 83 महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम सहकलम 188 भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, सहायक पोलीस निरीक्षक श्री. जितेन्द्र वैरागडे, पोउपनि जावेद शेख, पोहवा जावेद शेख, मदन आसतकर, पोलिस शिपाई बालाजी साखरे, राधेश्याम कांबळे, चालक पोहवा भाऊराव खंडाते यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर